


दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक




• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६३ वा • शनिवार, ता. ०६ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# अहिंसा, सत्याचा मार्ग आजच्या जगासाठीही दिशा दाखवतो- पुतिन

## राजघाटावर गांधी विचारांना सलाम



**नवी दिल्ली । रयत समाचार**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या दोन दिवसांच्या भारत दौऱ्यातील सर्वात महत्त्वाचा आणि प्रतीकात्मक क्षण म्हणजे दिल्लीतील राजघाटावर महात्मा गांधी यांच्या स्मृतिस्थळाला दिलेली भेट. येथे पुतिन यांनी स्मृतिपुस्तकात नोंदवलेला संदेश जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरत आहे. एएनआयने दिलेल्या माहितीनुसार, पुतिन यांनी गांधीजींच्या अहिंसा व सत्याच्या मार्गाची जगाला पुन्हा एकदा आवश्यकता असल्याचे अधोरेखित केले आहे.

पुतिन हे मोदींसोबत राजघाटावर आले तेव्हा प्रथेप्रमाणे त्यांना स्मृतिपुस्तकावर संदेश लिहण्याची विनंती करण्यात आली. त्यांनी आपल्या रशियन मातृभाषेत लिहिलेल्या संदेशात म्हटले आहे की, “महात्मा गांधींनी अहिंसा आणि सत्याच्या मार्गाने जगात शांततेसाठी अमूल्य योगदान दिले. त्यांच्या कार्याचे महत्व आजही अढळ आहे. आज निर्माण होत असलेले न्याय्य आणि बहुकेंद्रीत जागतिक व्यवस्थेचे स्वरूप गांधीजींनीच तेव्हा मार्गदर्शित केले होते. समानता, परस्पर आदर आणि सहकार्य यांची शिकवण भारत आजही जगासमोर उभी करतो; रशिया देखील ह्याच तत्त्वांचा मार्ग अनुसरत आहे.”हा संदेश पुतिन यांच्याकडून अशा वेळी आला आहे, जेव्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियावर ‘आक्रमक भूमिका’ घेतल्याचे आरोप होत आहेत. त्यामुळे पुतिन यांनी गांधीजींच्या विचारांची घेतलेली दखल अनेक तज्ञांच्या मते महत्त्वपूर्ण संकेत मानली जात आहे. दुसरीकडे, माध्यमांसमोर बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शांततेचा आग्रह पुनर्मांडला.

एएनआयच्या माहितीनुसार, मोदी म्हणाले की, “भारत तटस्थ नाही; भारताची बाजू शांततेची आहे. युद्धानंतर पुतिन आणि आमच्यातील चर्चा वाढल्या आणि खऱ्या मित्राप्रमाणे त्यांनी सर्व माहिती दिली. जगाची प्रगती शांततेच्या मार्गानेच होऊ शकते आणि आम्ही त्यासाठी प्रयत्नरत आहोत.” गांधीजींच्या स्मारकापुढे पुतिन यांनी व्यक्त केलेली भूमिका आणि मोदी यांनी समोर मांडलेला शांततेचा संदेश या दोन्ही गोष्टी पुतिन दौऱ्यातील सर्वाधिक महत्त्वाच्या ठरल्या आहेत. आंतरराष्ट्रीय दबाव, रशिया युक्रेन युद्ध आणि भारताची शांतताप्रिय भूमिका या पार्श्वभूमीवर गांधीवादाचा उद्गार पुन्हा जागतिक चर्चेत येणे ही नोंद घेण्याजोगी बाब ठरली आहे.

# इंडिगोची उड्डाण व्यवस्था कोलमडली १,००० हून अधिक उड्डाणे रद्द

## सरकारचे उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली । रयत समाचार**

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगोची उड्डाण व्यवस्था गेल्या चार दिवसांपासून गंभीरपणे विस्कळीत झाली असून शुक्रवारी कंपनीने तब्बल हजारावर उड्डाणे रद्द केली. पायलट रोस्टरिंगमधील मोठी गडबड, नवीन FDTL (Flight Duty Time Limit) नियमांसाठी अपुरी तयारी, मनुष्यबळ नियोजनातील त्रुटी आणि ऑपरेशनल चेन पूर्णपणे तुटल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. हिवाळ्यातील विलंबित उड्डाणांमुळे पायलटांच्या विश्रांती वेळा बिघडल्याने दिवसेंदिवस समस्या गंभीर होत गेली. मुंबई, दिल्ली, बेंगळुरू, चेन्नई, गोवा, गुजरात व पुणे यांसारख्या प्रमुख विमानतळांवर प्रवाशांचा प्रचंड गोंधळ

**सरकारची तातडीची उपाययोजना :**
सर्व रद्द उड्डाणांचे स्वयंचलित पूर्ण परतावा, दीर्घ विलंबित प्रवाशांसाठी हॉटेल व्यवस्था, ज्येष्ठ व दिव्यांगांसाठी विशेष सहाय्य व लाउंज ॲक्सेस, विमानतळांवर अन्न-पाणी सुविधा अनिवार्य, २४७ नियंत्रण कक्ष सुरू करून थेट निरीक्षण.

**इंडिगोची व्यवस्था का कोलमडली?**
पायलट रोस्टरिंगमध्ये मोठा गोंधळ, नवीन नियमांसाठी अपुरी तयारी, मनुष्यबळ नियोजनातील गंभीर त्रुटी, उड्डाणांचे नेटवर्क चक्र विस्कळीत, पायलट उपलब्धतेत मोठी घट.

करण्यात आली. दिल्ली व बेंगळुरू विमानतळावर तर इंडिगोची सर्व उड्डाणे रात्री उशिरापर्यंत स्थगित करण्यात आली. नागरी उड्डयन मंत्रालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत चार सदस्यीय उच्चस्तरीय समिती नेमली असून १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रालयाने विमान कंपन्यांना तातडीने प्रवाशांना मदत करण्याचे आदेश दिले असून रद्द उड्डाणांचा पूर्ण परतावा स्वयंचलितपणे देणे, मोठ्या विलंबित प्रवाशांना हॉटेल व्यवस्था, लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग प्रवाशांना प्राधान्य मदत, तसेच सर्वांना अन्न-पाणी उपलब्ध करून देणे अनिवार्य केले आहे. DGCA ने इंडिगोला रात्रीच्या ड्युटी मर्यादांमधून तात्पुरती सवलत देत परिस्थिती सुधारण्यास मदत केली आहे; मात्र पायलट संघटनांनी या




झाला. अनेकांना १०१२ तासांचे विलंब, रद्द झालेली उड्डाणे, बॅगेज विस्कळीतपणा आणि पर्यायी फ्लाइट न मिळाल्यामुळे संताप व्यक्त करावा लागला. काही विमानतळांवर प्रवाशांच्या गर्दीमुळे पोलिसांची अतिरिक्त तैनाती निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. इंडिगोने अधिकृत निवेदन देत प्रवाशांची माफी मागितली असून ५ ते १५ डिसेंबरदरम्यान प्रवास असलेल्या सर्व बुकिंगांसाठी शुल्कमुक्त बदल व रद्द करण्याची सुविधा जाहीर केली आहे.

# महात्मा गांधी मराठवाडा भूषण पुरस्काराने डॉ. भालचंद्र कांगो यांचा गौरव



**छत्रपती संभाजीनगर । रयत समाचार**

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव कॉ. डॉ. भालचंद्र कांगो यांना महात्मा गांधी मिशन संस्थेमार्फत दिला जाणारा ‘महात्मा गांधी मराठवाडा भूषण पुरस्कार’ भव्य समारंभात ज्येष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. पुरस्कार स्वीकारताना डॉ. कांगो यांना उपस्थित प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. सामाजिक बांधिलकी, वैचारिक निष्ठा आणि जनसंघर्षांतील सातत्यपूर्ण कार्य यांची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आल्याचे आयोजकांनी नमूद केले.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कौन्सिलतर्फे ॲड. कॉ. सुभाष लांडे, प्रा. राम बाहेती आदींनी पुष्पगुच्छ व शाल देऊन त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. डॉ. कांगो यांच्या सन्मानाने कार्यक्रमस्थळी भारावलेले वातावरण अनुभवायला मिळाले.

समारोपाला उपस्थित मान्यवरांनी सामाजिक न्याय, लोकशाही मूल्ये आणि परिवर्तनवादी विचारसरणी बळकट करण्यासाठी डॉ. कांगो यांच्या योगदानाचे विशेष कौतुक केले.


# सीटूच्या १७ व्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनाला उत्साही सुरुवात



**मुंबई । रयत समाचा**

सीटूचे १७ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन ता.५, ६ आणि ७ डिसेंबर २०२५ रोजी मुंबईत सुरू झाले. राज्यभरातून आलेल्या कामगार प्रतिनिधी आणि नेत्यांच्या उपस्थितीत अधिवेशनाची सुरुवात शहिद स्मारकाला अभिवादन करून झाली. लाल बावट्यांच्या साक्षीने कामगार हक्कांच्या लढ्याला बळ देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. तीन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात कामगारांचे ज्वलंत प्रश्न किमान वेतन, महागाई, सामाजिक सुरक्षा, असंगठित क्षेत्रातील कामगारांचे हक्क, तसेच श्रमिकविरोधी धोरणांविरोधातील आंदोलनाची रुपरेषा या विषयांवर सविस्तर चर्चा सुरू आहे. राज्यातील विविध उद्योग क्षेत्रांतील प्रतिनिधींनी आपल्या संघर्षांचा आढावा अधिवेशनात मांडला. टिळकनगर येथे आयोजित जाहीर सभेत कामगार नेत्यांनी सरकारकडून होत असलेल्या कायदेबदलांवर टीका केली. कामगारांच्या एकजुटीची गरज, संघटन बळकटीकरण आणि आंदोलन तीव्र करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी आगामी वर्षातील लढ्याची संयुक्त कृती योजना जाहीर होणार आहे.

# ‘देवदूत : द एंजेल’ महाकाव्याचा इटलीत गौरव




**इटली । रयत समाचार**

इटलीतील नामांकित समीक्षक आणि कवयित्री टेरेसा लटेर्झा यांनी भारतीय कवी सुधाकर गायधनी यांच्या इंग्रजी महाकाव्य ‘ ’ वर प्रभावी आणि संवेदनशील परीक्षण प्रसिद्ध केले असून, या अभूतपूर्व समीक्षेमुळे गायधनी यांच्या काव्यकृतीला आंतरराष्ट्रीय साहित्यविश्वात नवे वलय प्राप्त झाले आहे. ही समीक्षा altervista.org/blog या सुप्रसिद्ध साहित्य ब्लॉगवर प्रसिद्ध झाली असून, ब्लॉगच्या संचालिका एंजेलिका लटेर्झा यांनी या परीक्षणाला विशेष स्थान दिले आहे. महाकाव्याचे इंग्रजीवरून इटालियन भाषांतर डॉ. एन्झा साल्पिएत्रो यांनी केले असून, त्यांच्या भाषांतरकौशल्याचेही साहित्यविश्वात कौतुक होत आहे.

कवी गायधनी यांनी टेरेसा लटेर्झा, एंजेलिका लटेर्झा आणि डॉ. एन्झा साल्पिएत्रो यांचे मन:पूर्वक आभार मानत, त्यांचा हा सन्मान भारतीय काव्यपरंपरेचा सन्मान असल्याचे म्हटले आहे. समीक्षेची लिंक : https://angelicalaterza.altervista.org/blog/sudhakar-gaidhani-devdoot-langelo/

# ६४ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

## मुंबई केंद्रातून ‘ती, ती आणि ती’ प्रथम ‘ब्रेकपॉईंट’ द्वितीय



**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा मुंबई केंद्राचे निकाल जाहीर झाले असून सहप्रमुख कामगार अधिकारी शहर या संस्थेच्या ‘ती, ती आणि ती’ या नाटकाने प्रथम पारितोषिक पटकावले आहे. सेजल एंटरटेनमेंट प्रस्तुत ‘ब्रेकपॉईंट’ या नाटकाने द्वितीय, तर युटोपिया कम्युनिकेशन्सच्या ‘मिसेस हिटलर’ या नाटकाने तृतीय पारितोषिक मिळवले आहे. यातील प्रथम आणि द्वितीय क्रमांक प्राप्त केलेल्या नाटकांची अंतिम फेरीसाठी निवड झाली असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली.सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे अन्य निकाल पुढीलप्रमाणे

दिग्दर्शन : प्रथम पारितोषिक : नम्रता काळसेकर (ती, ती आणि ती), द्वितीय पारितोषिक : प्रितेश सोढा (मिसेस हिटलर), तृतीय पारितोषिक : सागर माने (ब्रेकपॉईंट) प्रकाश योजना : प्रथम : शाम चव्हाण (ती, ती आणि ती), द्वितीय : जयदीप आपटे (मिसेस हिटलर), तृतीय : संजय तोडणकर (कोणाच्या खांद्यावर) नेपथ्य : प्रथम : रजनीश कोंडविलकर (दानव), द्वितीय : यश मोडक (ब्रेकपॉईंट), तृतीय : प्रदीप पाटील (आम्ही आनंदयात्री) रंगभूषा : प्रथम : वर्षा जाधव (ब्रेकपॉईंट), द्वितीय : अनिल कासकर (दानव), तृतीय : सुनिल रघुनाथ (गाडी चुकली आणि) संगीत दिग्दर्शन : प्रथम : अक्षय जाधव (ती, ती आणि ती), द्वितीय : ओजस भट (मिसेस हिटलर), तृतीय : महेंद्र मांजरेकर (दानव) वेशभूषा : प्रथम : चंचल शिंदे (ब्रेकपॉईंट), द्वितीय : रुपेश नामये (जगद्गुरु तुकोबाराय), तृतीय : मंदार तांडेल (सोन्याचा पिंजरा) उत्कृष्ट अभिनय : रौप्यपदक : अरुण कदम (कोणाच्या खांद्यावर), सेजल कांबळे (दानव) अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे : सुचीत ठाकूर (मोक्षदाह), सुमित घाग (ब्रेकपॉईंट), श्रीकांत मोरे (आमच्या या घरात), सौरभ इसवारे (गेली एकवीस उंट), आशिष जोशी (मिसेस हिटलर), डॉ. यशश्री कंटक (शनिवार रविवार), मानसी नाटेकर (मिसेस हिटलर), नयना पवार (अथांग), अलका फोन्सेका (ढोलताशे), कल्पना भिसे (सोन्याचा पिंजरा).

दि. ७ नोव्हेंबर २०२५ ते २८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत साहित्य संघ मंदिर, गिरगाव, मुंबई येथे अत्यंत जल्लोषात झालेल्या प्राथमिक फेरीत २२ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. परीक्षक म्हणून चंद्रशेखर बेंद्रे, कैलास टापरे आणि सरिता अनिरुद्ध यांनी कार्यभार सांभाळला. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले. तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त नाटके आणि कलाकारांचे कौतुक करत आगामी कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्थांनी उपजत प्रतिभा आणि नाट्यकलेबद्दलची निष्ठा यांचे उत्कृष्ट दर्शन घडवले असून प्रेक्षकांनीही या दर्जेदार नाटकांना उत्स्फूर्त दाद दिली.

# समाजात द्वेष व अशांतता निर्माण करणाऱ्यांना चाप



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

बेळगावमध्ये ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकार एकूण आठ विधेयके सादर करणार आहे. गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकांवर चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीनंतर कायदा मंत्री एच. के. पाटील यांनी पत्रकार परिषदेत तपशील दिला. मंत्रिमंडळाने समाजात द्वेष, अशांतता, जातीय तणाव आणि कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या भाषणांना आळा घालण्यासाठी महत्त्वपूर्ण द्वेष भाषण प्रतिबंधक विधेयकाला संमती दिली आहे. या विधेयकाद्वारे द्वेषपूर्ण भाषणाची व्याख्या स्पष्ट करण्यात आली असून समाजविघातक वक्तव्ये व कृतींवर कठोर नियंत्रण ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. या विधेयकांचा उद्देश सामाजिक सौहार्द राखणे आणि कायदा-सुव्यवस्थेला धोका पोहोचवणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालणे हा आहे.

राज्यात वाढत्या द्वेषपूर्ण भाषण आणि द्वेषयुक्त गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे विधेयक बेळगाव अधिवेशनात मांडले जाणार आहे. विधेयकात पुढील तरतुदी प्रस्तावित आहेत: भाषा, जात, धर्म, जन्मस्थान यांच्या आधारे केलेले द्वेषयुक्त भाषण व कृती शिक्षापात्र गुन्हे मानले जातील. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या मजकुराबाबत डिजिटल मध्यस्थ सोशल मीडिया कंपन्या, सर्च इंजिन, टेलिकॉम ऑपरेटर, ऑनलाईन मार्केटप्लेस, इंटरनेट सेवा पुरवठादार यांनाही जबाबदार धरण्याची तरतूद. जातीय दंगलींचा धोका असलेल्या भागांत जिल्हाधिकाऱ्यांना विशेष अधिकार. सभा, मिरवणुका, लाऊडस्पीकर वापर, प्रक्षोभक विधाने किंवा समाजात भीती-द्वेष निर्माण करणारी कोणतीही कृती प्रतिबंधित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असतील. हे निर्बंध सुरुवातीला ३० दिवसांपर्यंत, गरजेनुसार ६० दिवसांपर्यंत वाढवता येतील.

जून महिन्यात हे विधेयक मंत्रिमंडळासमोर आले होते; मात्र काही मुद्द्यांवरील अस्पष्टता व सुधारणा आवश्यक असल्याने मंजुरी पुढे ढकलण्यात आली होती. सर्व शंकांचे निरसन करून यंदा विधेयकाला मंजुरी देण्यात आली आहे. द्वेषपूर्ण वक्तव्यांवर कठोर कायदा आल्याने राज्यात शांतता, सामाजिक एकोपा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास राज्य सरकारने व्यक्त केला आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत पुढील आठ विधेयकांना हिरवा कंदील देण्यात आला: द्वेष भाषण प्रतिबंधक विधेयक, बयलुसीमे प्रदेश विकास मंडळ दुरुस्ती विधेयक, मलनाड विकास प्राधिकरण विधेयक, हिंदू धार्मिक संस्था आणि धर्मादाय दुरुस्ती विधेयक, गोवंश हत्या प्रतिबंधक आणि संरक्षण विधेयक, सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक विधेयक, कर्नाटक अंतर्गत नौका नियम विधेयक, द्वेषपूर्ण गुन्हे आणि द्वेष प्रतिबंध विधेयक २०२५



टीईटी सक्ती रद्द करावी



# जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा विराट मोर्चा

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक व माध्यमिक शिक्षक संघटनेच्या वतीने टीईटी सक्ती रद्द करावी, जुनी पेन्शन लागू करावी व रिक्त पदभरती तात्काळ सुरू करावी या प्रमुख मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आज विराट मोर्चा काढण्यात आला. शासनाने शिक्षकांवर लादलेली टीईटी सक्ती अन्यायकारक असल्याने ती तातडीने मागे घेण्याची मागणी यावेळी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.

मोर्चात आमदार सत्यजित तांबे, शिक्षक नेते प्रवीण ठुबे, रावसाहेब रोहोखले, संजय कळमकर, आबासाहेब जगताप, संजय धामणे, भास्कर नरसाळे, अविनाश निंभोरे, सुनील पंडित, महेश हिंगे, दिनेश खोसे, शरद कोतकर, संतोष सरोदे, राम कदम, बाबासाहेब बोडखे, रघुनाथ झावरे, अमित पन्हाळे, सिताराम सावंत, तौसीफ सय्यद, दत्ता जाधव, विजय महामनी, गणेश वाघ, बाळासाहेब रोहकले, विजय देठे, आप्पासाहेब जगताप, जयश्री झरेकर, आप्पासाहेब शिंदे व जिल्ह्यातील मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते.

शिक्षक संघटनेने सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, टीईटी अनिवार्यतेवरील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार याचिका दाखल करण्यात शासनाकडून होत असलेला विलंब चिंताजनक असून यामुळे राज्यातील



शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शिक्षण विभागाने टीईटी निकालाचा चुकीचा अर्थ लावून सुरू केलेल्या कारवाया तात्काळ थांबवाव्यात, अशीही मागणी करण्यात आली.

निवेदनात पुढे जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करावी, शिक्षण सेवक योजना रद्द करून नियमित वेतनश्रेणी लागू करावी, शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी १०२०३० वर्षांनंतरची सुधारित वेतन प्रगती योजना अमलात आणावी या मागण्यांचाही समावेश आहे. तसेच १५ मार्च २०२४ चा संचमान्यता विषयक शासन निर्णय रद्द करावा, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बंद भरती सुरू करून सर्व रिक्त पदे १०० टक्के भरावीत, शिक्षकांवर लादलेली अशैक्षणिक व ऑनलाईन कामे थांबवावीत, विषयपदवीधर शिक्षकांना पदवीधर वेतनश्रेणी कोणताही भेदभाव न करता मंजूर करावी या मागण्या मांडण्यात आल्या.

वस्ती शाळेतील शिक्षकांना नियुक्ती तारखेपासून सर्व सेवा लाभ देण्यात यावेत, आश्रमशाळांतील कंत्राटी भरतीचे धोरण रद्द करावे, अल्पसंख्याक शाळांना स्वमान्यता व नियुक्तीसाठी विशेष सवलत द्यावी, कमी पटाच्या शाळा न बंद करता शिक्षक क्रम सुरू ठेवावा, अशा मागण्या देखील संघटनेने मांडल्या. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागण्यांमुळे शिक्षकवर्गामध्ये असंतोष वाढत असून शासनाने सकारात्मक दृष्टीकोनातून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

मागण्या मान्य न झाल्यास राज्यभर शाळा बंद ठेवून उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिक्षक संघटनेकडून देण्यात आला.

# स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती उत्सव उत्साहात

**अहमदनगर । विजय मते**

सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेतर्फे आयोजित दत्त जयंती उत्सवाची उत्साहात सांगता करण्यात आली. गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या पारायण सोहळ्याचा समारोप श्री दत्तयाग, जन्म सोहळा, भजन संध्या आणि महाप्रसादाने झाला.

या पारायणात महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून श्री गुरुचरित्र पारायण केले. दत्त जयंती निमित्त पहाटे श्रींचा रुद्राभिषेक संपन्न झाला. श्री दत्तयागावेळी सेवेकरी श्री व सौ. कीर्ती पंकज गुजराथी यांच्या हस्ते होमहवनास आहुती देण्यात आली, तर त्याचे पौराहित्य निखिल देवरे यांनी केले. सायंकाळी सहा वाजता दत्त जन्म सोहळा भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. कार्यक्रमात श्री आदेश चव्हाण यांनी 'धाव धाव श्री स्वामी समर्थ' ही भक्तिगीते सादर करून भाविकांची मने भारावून टाकली.

दत्त जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन



करण्यात आले होते. या शिबिरास भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दुपारी महाआरती होऊन महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. गेल्या आठवडाभरात दत्त जन्मोत्सवासाठी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मंदिराच्या वतीने सर्व सेवेकरी आणि कार्यकर्त्यांनी परिश्रम घेऊन हा सोहळा यशस्वी केला.

# महिला साहित्यिकांसाठी काव्य लघुकथा सादरीकरणाची संधी

## ज्ञानकौशल्य ट्रस्ट व कर्मलक्ष्मी महिला मंडळातर्फे महिला साहित्य संमेलनाची तयारी

**अहमदनगर । रयत समाचार**

जागतिक महिला दिनानिमित्त (८ मार्च २०२६) महिला साहित्यिकांना एकाच व्यासपीठावर आणून स्वातंत्र्य, समता आणि सशक्तीकरण या विषयांवर मुक्त चर्चा व्हावी, तसेच त्यांच्या साहित्यकौशल्याला योग्य मंच मिळावा या उद्देशाने पहिले राज्यस्तरीय महिला साहित्य संमेलन आयोजित केले जाणार असल्याची माहिती 'ज्ञानकौशल्य ट्रस्ट'च्या सचिव माधुरी सचिन चोभे यांनी दिली. ज्ञानकौशल्य ट्रस्ट (अहिल्यानगर) आणि कर्मलक्ष्मी महिला मंडळ (मांडवगण, ता. श्रीगोंदा) यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या संमेलनासाठी कविता आणि लघुकथा ता. २६ जानेवारी २०२६ पूर्वी पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. महिलांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि साहित्यिक योगदानाचा गौरव करण्यासाठी, तसेच त्यांच्या अभिव्यक्तीला बळकटी देण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला आहे. या संमेलनात निवडक ३० कविता आणि ५ लघुकथा कथाकथनाच्या माध्यमातून सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. प्रवेशिका तपासल्यानंतर निवड झालेल्या साहित्यिकांना सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात येईल. तसेच, सादरीकरण करणाऱ्या व सहभागी सर्वांना सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह प्रदान केले जाणार आहे.

कविता व कथा पाठवण्यासाठी गुगल फॉर्मची लिंक पुढीलप्रमाणे आहे: https://forms.gle/eR69zEshKgvdzJzz9 कर्मलक्ष्मी महिला मंडळाच्या अध्यक्षा मार्या थोरात यांनी सांगितले की, कथाकविता सादरीकरण हा पूर्णपणे ऐच्छिक उपक्रम असून यासाठी कोणतेही शुल्क नाही. सध्याच्या साहित्यसंस्कृतीच्या प्रवाहात महिलांना अपेक्षित व्यासपीठ मिळत नसल्याने त्यांची दर्जेदार साहित्यकृती मागे पडतात.

पुरुषप्रधान साहित्यविश्वात महिलांचे योगदान अधिक ठळकपणे पुढे यावे यासाठीच या विशेष राज्यस्तरीय संमेलनाची कल्पना साकार करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. संमेलनाची संयोजन समिती संपूर्णतः महिलांचीच असणार आहे. अधिक माहितीसाठी Facebook – dnyankaushalya1@gmail.com महिला साहित्यिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'सदाबहार देव साहब' संगीत कार्यक्रमाचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

भारतीय चित्रपटसृष्टीतील सदाबहार अभिनेता देव आनंद यांच्या अमर गाण्यांना समर्पित 'सदाबहार देव साहब' हा विशेष संगीत कार्यक्रम अहिल्यानगरमध्ये आयोजित करण्यात आला आहे. रविवार, ता. ७ डिसेंबर, सायंकाळी ५ ते ८ या वेळेत रावसाहेब पटवर्धन सभागृहात ही सुरेल मैफल रंगणार आहे.



शहरातील नाईंटीज टॉकीज या संस्थेच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, याबाबतची माहिती संयोजक ॲड. सचिन चंदनशिव यांनी दिली.

कार्यक्रमात देव आनंद यांच्या 'गाइड', 'ज्वेल थीफ', 'हरे रामा हरे कृष्णा', 'माया', 'हम दोनों' या सुप्रसिद्ध चित्रपटांतील गाजलेली गाणी सादर केली जाणार आहेत.

या गीतमैफिलीत भानुदास महानूर, चारुदत्त ससाणे, सुनील भंडारी, बाबासाहेब जगताप, डॉ. रेश्मा चेडे, प्रतिभा साबळे, सुशील देठे आदी अनुभवी गायक-वादक सहभागी होत असून, त्यांच्या सादरीकरणातून रसिकांना जुन्या आठवणींना उजाळा देणारा आनंददायी अनुभव मिळणार आहे.

संगीत रसिकांसाठी ही एक मोठी पर्वणी असल्याने अधिकाधिक रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक डॉ. विवेकानंद कंगे यांनी केले आहे.

# उपनगरातील पाणीपुरवठा विस्कळीत

## ८ दिवसांत सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेतील सर्वात मोठ्या उपनगरांपैकी एक असलेल्या केडगाव परिसरात पाणीपुरवठ्याची स्थिती गंभीर बनली असून गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. परिसरात दर ७८ दिवसांनी होणारा पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने होत असल्याने दैनंदिन घरगुती कामकाज, स्वच्छता आणि आरोग्यावर थेट परिणाम होत आहे.




या गंभीर परिस्थितीबाबत लक्ष वेधण्यासाठी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन सादर केले आहे. येणाऱ्या ८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न केल्यास मनपा मुख्यालयात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा कठोर इशारा त्यांनी दिला आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, केडगावची लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा वाढविण्याची गरज होती. मात्र प्रत्यक्षात पाणीपुरवठा दिवसेंदिवस कमी होत असून अनेक कुटुंबांना महागडे खाजगी टँकर घेण्याची वेळ आली आहे. पिण्याचे पाणीही नीट उपलब्ध नसल्याने महिला, कामगार, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या अडचणीत आहेत.मनोज कोतकर यांनी सांगितले की, गेल्या ४५ महिन्यांत कमी दाबाने व अनियमित पाणीपुरवठ्याबाबत सतत पत्रव्यवहार, फोनद्वारे संपर्क तसेच प्रत्यक्ष भेटीतून मनपालिकेला तक्रारी कळविण्यात आल्या; मात्र अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. पाण्यासारख्या मूलभूत गरजेबाबत मनपा प्रशासनाचा कारभार नियोजनशून्य असल्याची टीका त्यांनी केली. कोतकर म्हणाले की, ७८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत व पूर्ण दाबाने न झाल्यास संतप्त नागरिकांसह मनपा मुख्यालयात मोठे आंदोलन उभारले जाईल आणि त्यातून उद्भवणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर राहील.

## मौलाना आझाद जयंतीनिमित्त मोतीबिंदू शिबिर

# आरोग्यसेवा ही सुविधा नसून समाजासाठी केलेली खरी सेवा– राजुभाई शेख

**अहमदनगर । आबीद खान**

स्वातंत्र्यसेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद जयंती आणि राष्ट्रीय एकता सप्ताहानिमित्त मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय आणि अलनुर आय केअर सेंटर यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आरोग्यसेवा ही समाजाच्या विकासाची मूलभूत गरज असून, डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष जीवनातील अनेक संधी




निसटवते, असे प्रतिपादन मखदुम सोसायटीचे उपाध्यक्ष राजुभाई शेख यांनी उद्घाटन प्रसंगी केले. त्यांनी पुढे सांगितले की, "आरोग्यसेवा ही केवळ सुविधा नसून समाजासाठी केलेली खरी सेवा आहे. अशा उपक्रमांतून केवळ उपचारच नव्हे, तर नागरिकांमध्ये जागरूकता व आत्मविश्वास निर्माण होतो."

शिबिरात एकूण १०५ रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली, तर १५ रुग्णांना मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पुण्यास पाठविण्यात आले. नेत्रतज्ज्ञांनी सूक्ष्म तपासणी करून आवश्यक मार्गदर्शन दिले. नागरिकांना मिळालेल्या या मोफत आरोग्यसेवेबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमास राजुभाई शेख, तनवीर चष्मावाला, आनंद बोज्जा, वेदांत बोमादंडी, अभिषेक शिंदे, शेख नूरसाहब, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, रेहान शेख, आसीफ पटवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुकुंदनगरमध्ये सातत्याने आयोजित मोतीबिंदू शिबिराबद्दल नागरिकांनी मखदुम सोसायटी आणि अलनुर आय केअर सेंटरचे आभार मानले. प्रास्ताविक तनवीर चष्मावाला यांनी करत वर्षभर असे शिबिरे आयोजित करण्याचे आश्वासन दिले व डोळ्यांच्या संरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन शफकत सय्यद यांनी केले, तर आभार प्रदर्शन आबीद खान यांनी केले.

## अभिनेते धर्मेंद्र स्मृतिप्रीत्यर्थ गीत महफिल

**अहमदनगर । आबीद खान**

बॉलिवूडचे सुप्रसिद्ध 'ही-मॅन' धर्मेंद्र यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'गाता रहे मेरा दिल' समूहाच्या वतीने श्रद्धांजली गीतांची महफिल शनिवार, ता. ६ डिसेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ७ वाजता, सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान सभागृहात आयोजित करण्यात आल्याची माहिती ॲड. अमीन धाराणी यांनी दिली. या विशेष महफिलीत सुनील भंडारी, डॉ. सुद्रिक, संजय भिंगारदिवे, अभय मोहिते, माधवी गुजर, नरेश पेवाल, अमिन धाराणी, जीवन महाजन, मुख्तार शेख, चारू ससाणे, जगताप, राजू सावंत, राजेंद्र शहाणे, रज्जाक शेख आदी कलाकार गाणी सादर करणार आहेत. सूत्रसंचालन राजू सावंत करतील. कार्यक्रमासाठी सिस्टीम व तांत्रिक सहायाची व्यवस्था अमीन धाराणी यांच्याकडून करण्यात आली असून, सर्व रसिकांसाठी मोफत प्रवेश खुला आहे.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे
ख्रिसमस विशेषांक
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
– अतिथी संपादक –
सॅम्युअल वाघमारे
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
लेख, माहिती व जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# बाळासाहेब थोरातांकडून काँग्रेसनिष्ठा 'मिस'

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

काँग्रेस श्रेष्ठींच्या यादीत अग्रस्थानी असणारे काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मनात काँग्रेस पक्षाबद्दल अनास्था तयार झाली आहे. काँग्रेस पक्षामुळे आपला पराभव झाल्याचा त्यांना संशय आहे. राज्यभर नगरपालिकेच्या निवडणुकीत थोरात यांना विशेष अधिकार असताना देखील स्वतःच्या संगमनेर नगरपालिकेत ते अपक्ष लढले. थोरात यांची काँग्रेस पक्षावरील निष्ठा मिस झाली आहे.

बाळासाहेब थोरात हे काँग्रेस पक्षातील ज्येष्ठ नेते मानले जातात. '' थोरात म्हणजे काँग्रेस आणि काँग्रेस म्हणजे थोरात '' असे समीकरण राज्यभर आहे. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षच थोरात चालवितात, हे कुणीही नाकारणार नाही. मात्र असे असतानाही संगमनेर नगरपालिकेच्या निवडणुकीत थोरात यांनी काँग्रेसला गुंडाळून अपक्ष निवडणूक लढविण्यास प्राधान्य दिले. या संदर्भात सर्वत्र अचंबा व्यक्त केला जात आहे. अपक्ष निवडणूक लढवून थोरात यांनी विरोधकांना चर्चेला वाट मोकळी करून दिली आहे. गेल्या दीड वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांना अफलातून अशा पराभवाला सामोरे जावे लागले. या बाबत महाराष्ट्र हळहळत आहे. काँग्रेस पक्ष आता पराभवाचा कळप बनला आहे. या अंधश्रद्धेवर पार पडलेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत थोरात यांनी काँग्रेसच्या सर्व त्या चाव्या हातात असताना काँग्रेस पक्षातून निवडणूक लढविण्यापासून ते परावृत्त झाले. नगरपालिका निवडणुकीत थोरात यांनी काँग्रेसला अंधारात ठेवले. भाचे आमदार सत्यजित तांबे यांना पुढे करून लढविलेल्या निवडणुकीबाबत काँग्रेस श्रेष्ठींनी दखल घेतली आहे. संगमनेर नगरपालिका ही काही अपवाद वगळता स्थापनेपासून थोरात यांच्या ताब्यात राहिली आहे. दुर्गा तांबे या संगमनेर नगरपालिकेच्या दीर्घकाळ नगराध्यक्ष होत्या. तांबे या थोरात यांच्या भगिनी, डॉ. सुधीर तांबे यांच्या त्या सौभाग्यवती तर आमदार डॉ. सत्यजित तांबे यांच्या त्या मातोश्री आहेत. नाशिक पदवीधर मतदार संघाची उमेदवारी रीतसर, प्रथम प्राधान्याने तसेच हक्कानुसार सुधीर तांबे यांना मिळाली होती. मात्र त्यांनी ती नाकारली. काँग्रेस कडून मिळालेला एबी फॉर्म ही त्यांनी स्वतःकडेच ठेवला. तेथे सत्यजित तांबे यांना



भारतीय जनता पक्षाचा पाठिंबा मिळवत अपक्ष उभे करून निवडून आणले. येथे सुधीर तांबे यांनी काँग्रेसला अंधारात ठेवून काँग्रेस पक्षाशी गद्दारी केली, असा आरोप काँग्रेस श्रेष्ठींनी केला आहे. एबी फॉर्म देऊनही सुधीर तांबे यांनी तो घरात ठेवत सत्यजित तांबे यांना भाजपचा पाठिंबा घेत निवडणुकीला अपक्षच्या नावाखाली सामोरे गेले, येथे काँग्रेसचा मोठा अपमान झाल्याचे शल्य संपूर्ण महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षश्रेष्ठींमध्ये आहे. पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकी अगोदर बाळासाहेब थोरात यांनी सत्यजीत तांबे यांच्या पुस्तकाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते मुंबईत प्रकाशन केले आणि तेथेच पदवीधर मतदार संघाची निवडणूक लढविण्यासंदर्भात प्लॅन शिजला, अशी सर्वत्र चर्चा आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष

> मी सुद्धा सत्ताधारी पक्षात आहे, असे भाष्य सत्यजित तांबे यांनी अलीकडेच वेळोवेळी केले आहे. सोशल मीडियावर त्यांचे या भाष्याचे व्हिडिओ देखील व्हायरल झाले आहेत. तांबे जर सत्ताधारी पक्षात असतील तर बाळासाहेब थोरात यांनी त्यांचा प्रचार करून काँग्रेसला आव्हान दिले आहे

नाना पटोले यांनी थोरात, तांबे यांना या संदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावली. तेव्हापासून हे दोघेही काँग्रेस पासून चार हात दूर आहेत. नगरपालिकेच्या निवडणुकीत जिल्ह्यात संगमनेर सोडून थोरात कुठेही फिरकले नाहीत. यावरून ते काँग्रेस मध्ये ते फक्त शरीराने आहेत. काँग्रेसमध्ये थोरातांना मंत्रिमंडळात आजपर्यंत सर्वाधिक वरचे महत्त्वाचे खाते आणि स्थान दिले गेले. मात्र नाशिक पदवीधर मतदार संघ आणि विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्याने थोरात, तांबे यांना काँग्रेस अपशकुन वाटू लागली आहे. विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव थोरात यांना आजही अमान्य आहे. पराभवाची त्यांनी खूप धास्ती घेतली आहे. तोंड पोळल्यानंतर ताकही फुंकून प्यावे अशाप्रकारे त्यांची राजकीय रणनीती चालू आहे. संगमनेर नगरपालिकेत थोरात यांनी काँग्रेस पक्षाचे चिन्ह न घेता निवडणूक लढवली या संदर्भात विरोधकांनी मोठे रान पेटवले आहे. थोरात आणि तांबे आजही शरीराने काँग्रेसमध्ये असल्यासारखे वाटतात मात्र त्यांच्या मनात वेगळेच काही चालू असल्याचे झालेल्या निवडणुकीवरून स्पष्ट होते, जिल्ह्यातील अन्य काँग्रेस जन यामुळे मोठ्या पेचात सापडले आहे. थोरात काँग्रेस मध्ये राहणार का त्याग करणार असा प्रश्न काँग्रेस सह अन्य काही विरोधी पक्ष एकमेकांना खाजगीत विचारीत आहेत. नाशिक पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत भाचे सत्यजित तांबे यांना थोरात यांनी मोठी रसद पुरविली. आमदार सत्यजित तांबे यांचा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनीही मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या आदेशानुसार प्रचार केला. थोरात आणि सुधीर तांबे यांच्या पक्षनिष्ठे संदर्भात सर्वत्र शंका कुशंका सुरू झाल्या असून काँग्रेस श्रेष्ठी याबाबत कोणता आणि कसा व कधी निर्णय घेतात, याकडे राज्यातील निष्ठावंत काँग्रेस जणांचे लक्ष लागले आहे.

## देवगड येथे दत्तजयंती उत्साहात



**नेवासा । विजय खंडागळे**

''दिगंबरा... दिगंबरा... श्रीपाद वल्लभ दिगंबरा'' या जयघोषाने निनादलेल्या श्री क्षेत्र देवगड येथे भगवान दत्तात्रेय जन्मोत्सव सोहळा गुरुवार, सायंकाळी सहा वाजता भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. महंत भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संतमहंतांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी, शंखनाद व मंत्रोच्चारांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. लाखो भाविकांनी उपस्थित राहून हा सोहळा मोठ्या श्रद्धेने अनुभवला.

हभप भास्करगिरी महाराज तथा उत्तराधिकारी स्वामी प्रकाश नंदगिरी महाराज यांच्या हस्ते भगवान दत्तात्रेयांच्या मूर्तीचे पूजन व आरती करण्यात आली. मंदिर परिसर विद्युत रोषणाई व पुष्पसजावटीने उजळून निघाला होता. विशेष तयार केलेल्या पुष्पमंडपातील पाळण्यात भगवान दत्तात्रेयांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. विधिवत पूजा झाल्यानंतर वेदमंत्रोच्चारात जन्मोत्सव साजरा करण्यात आला

पाळणा सोहळ्यात गुरुवर्य भास्करगिरी महाराज, स्वामी प्रकाश नंदगिरी महाराज, प्रयागराज येथील स्वामी पंडित राज मिश्रा, महंत कैलासगिरी महाराज, महंत रमेशानंद गिरी महाराज, महंत आवेराज महाराज यांच्या हस्ते पाळण्याची दोरी ओढण्यात आली.

या सोहळ्यास स्वामी प्रकाश नंदगिरी महाराज यांच्या मातोश्री मीराबाई मते, जनार्धन महाराज मेटे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे पाटील, नेवासा महायुतीचे आमदार विठ्ठलराव लंघे, माजी आमदार पांडुरंग अभंग, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, विश्व हिंदू परिषदेचे आप्पा बारगजे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कृषि तंत्रज्ञान शिक्षण विभागाचा उन्नत अभ्यासक्रम राज्यासाठी दिशादर्शक- डॉ. बोडके



**राहुरी । रयत समाचार**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत कृषि तंत्रज्ञान विभागाद्वारे कृषि तंत्र पदविका, कृषि तंत्र निकेतन आणि माळी प्रशिक्षण या अभ्यासक्रमांमध्ये भारत सरकारच्या नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगत सुधारणा करण्यासाठी आयोजित प्राचार्यांची राज्यस्तरीय बैठक सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

बैठकीत कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम दोन वर्षे), कृषि तंत्र पदविका (इंग्रजी माध्यम तीन वर्षे) आणि माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमात नवनवीन तंत्रज्ञानाचा समावेश, कौशल्याधारित अध्यापन आणि कृषि क्षेत्रातील आधुनिक पिक व्यवस्थापन तंत्रांचा समावेश करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे नवीन कुलगुरू मा. डॉ. विलास खर्चे यांच्या निवडीबद्दल अभिनंदन करून बैठकीला सुरूवात झाली.

डॉ. बोडके म्हणाले, ''विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील विविध पिकांच्या जाती, लागवड तंत्रज्ञान, नैसर्गिक शेती आणि कौशल्यपूर्ण प्रशिक्षण देणे हा कृषि विद्यापीठांचा मूळ उद्देश आहे. नवीन शैक्षणिक धोरणाशी सुसंगत अभ्यासक्रम उन्नत करणे ही काळाची गरज असून हा अभ्यासक्रम राज्यातील अन्य तीन कृषि विद्यापीठांतही लागू करण्याचा मानस आहे.'' उन्नत अभ्यासक्रमांचे मसुदे विद्यापीठाच्या तज्ञ समितीकडून आणि वैधानिक समित्यांकडून मान्यतेसाठी सादर केले जाणार आहेत. कृषि तंत्र निकेतन (इंग्रजी माध्यम) अभ्यासक्रम इयत्ता बारावी समकक्ष करण्यासाठी आवश्यक सुधारणा करण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीस डॉ. रवींद्र सूर्यवंशी, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. सचिन मगर, डॉ. योगेश पाटील, डॉ. जितेंद्र पाटील, डॉ. मनोज माळी, डॉ. संतोष नेवरे, डॉ. हेमंत जाधव, डॉ. सागर खारगे, डॉ. आशिष रासकर, डॉ. राधाकृष्ण गायकवाड, डॉ. सुरज गडाख आदी उपस्थित होते. सहायक कुलसचिव हेमंत सोनार आणि मंदार जोशी यांनीही सहभाग नोंदवला. प्रास्ताविक तांत्रिक अधिकारी हेमचंद्र परदेशी यांनी केले.

## काळेगाव शाळेला शैक्षणिक साहित्य व फळे वाटप

**शेवगाव । नरहरी शहाणे**

स्वर्गीय आमदार राजीव राजळे यांचा राजकीय क्षेत्राबरोबरच शैक्षणिक क्षेत्रावरील अभ्यास अत्यंत दांडगा होता. लेखनवाचन संस्कृती वाढावी यासाठी त्यांनी कायम भूमिका घेत ग्रंथालय चळवळीत प्राण फुंकले. ''ध्यान मंदिराबरोबरच ज्ञान मंदिरांचीही उंची वाढली तरच सर्व क्षेत्रांत परिवर्तन होईल,'' असे मत भाजपा युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष अनिल सुपेकर यांनी व्यक्त केले.

शेवगाव तालुक्यातील पुनर्वसित काळेगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत स्व. राजीव राजळे यांच्या ५६ व्या जयंतीनिमित्त सुपेकर यांनी स्वखर्चातून दोन व्हाईट बोर्ड, शालेय साहित्य तसेच विद्यार्थ्यांना सफरचंद आणि केळीचे वाटप केले.

यावेळी बोलताना सुपेकर म्हणाले, ''ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, तरच ते भविष्यात मोठ्या पदांवर पोहोचू शकतील. ग्रामीण शाळांना



> जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधून दर्जेदार शिक्षण मिळत असल्याने पालकांचा ओढा या शाळांकडे वाढत आहे. भौतिक सुविधांचा अभाव असला तरी विद्यार्थी स्वतः सिद्ध होत आहेत, त्यामुळे शाळांचा नावलौकिक वाढतो आहे. अशा सामाजिक उपक्रमांमुळे शैक्षणिक बळ मिळते व शिक्षकविद्यार्थ्यांचा उत्साह वाढतो.
>
> **– संदीप आहेर,**
> मुख्याध्यापक

भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. स्व. राजीव राजळे यांची ग्रामीण मुलामुलींच्या शिक्षणाविषयीची भूमिका जिवंत ठेवण्यासाठी हा उपक्रम राबवताना मला अभिमान वाटतो.''

भौतिक सुविधांची कमतरता असतानाही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमुळे मनाला समाधान मिळाल्याचेही त्यांनी सांगितले. ''शिक्षण क्षेत्राविषयी स्व. राजळे यांनी घालून दिलेल्या कार्याचा विचार शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी यापुढील काळात अधिक मोठी कामे राबविणे गरजेचे आहे,'' असेही सुपेकर म्हणाले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक संदीप आहेर, सहशिक्षक लक्ष्मण पिंगळे आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शहाराम आगळे उपस्थित होते. उपक्रमाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थिनी मयुरी कडूस हिने उपस्थितांचे आभार मानले.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### विकासाचा जाहीरनामाच नाही

श्रीरामपूर नगरपालिका निवडणुकीचे मतदान एकदाचे पार पडले. आता सर्वांना २१ डिसेंबर रोजी लागणाऱ्या निकालाची प्रतीक्षा आहे. मात्र आता निवडणुकीनंतरचे कवित्व सर्वत्र सुरू आहे. या निवडणुकीत काँग्रेस, शिवसेना दोन्ही गट, भाजपा, राष्ट्रवादी, समाजवादी पार्टी यासह काही अपक्ष उमेदवार देखील होते. काँग्रेस पक्षाचे करण ससाणे, भाजपा - राष्ट्रवादीचे श्रीनिवास बिहानी, शिवसेना शिंदे गटाचे प्रकाश चित्ते हे प्रमुख उमेदवार नगराध्यक्ष पदासाठी होते. नगरसेवक पदासाठी देखील या पक्षांनी उमेदवार उभे केले. शिंदे गटाला सर्व ३४ भागात उमेदवार देण्यास अपयश आले. त्यांनी ३२ उमेदवार उभे केले मात्र त्यांचे काही उमेदवार हे फक्त नावाला होते. त्यांनी फारसा प्रचार केला नाही. सर्व प्रमुख पक्षांनी केवळ एकमेकांवर चिखलफेक केली. श्रीरामपूर शहराच्या विकासासाठी आम्ही काय करणार, त्यासाठीचा आमचा जाहीरनामा काय हे कोणीही सांगितले नाही. कोणत्याही पक्षाने शहरासाठी जाहीरनामा प्रसिद्ध न करण्याची ही पहिलीच वेळ. भाजप-राष्ट्रवादीने आम्ही सत्तेत आहोत त्यामुळे आम्ही निधी आणू शकतो विरोधी काँग्रेसचे लोक निधी कसा आणणार असा प्रचार केला. तर काँग्रेसचे आमदार हेमंत ओगले यांनी मागील वर्षभरामध्ये साडेसात कोटी रुपये निधी शासनाचा मतदार संघात आणल्याचे ठिकठिकाणी सांगितले. लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या मागणीला सरकारला साथ द्यावीच लागते, मागण्या मान्यच कराव्या लागतात असे त्यांनी सांगितले. तर शिवसेनेने नगर विकास खाते हे एकनाथ शिंदे यांचे कडे आहे त्यामुळे शहराला निधी कमी पडणार नाही असे सांगितले. मात्र शहराचा कोणता विकास करणार नवीन काय करणार वाढत्या शहरीकरणाचे निर्माण झालेले नवीन प्रश्न कोणत्या पद्धतीने सोडवणार याबाबत कोणत्याही पक्षाने काहीही सांगितले नाही. त्यामुळे श्रीरामपूर नगरपालिकेची निवडणूक एक सोपस्कार म्हणून पार पडलेली आहे. उमेदवारी देताना सुद्धा कोणत्याही पक्षाने विशिष्ट असे निकष लावले नाही. हा एक निकष सर्वांनी लावला तो म्हणजे दाम. कोणता उमेदवार दामकरी आहे आणि तो किती खर्च करू शकतो याचे गणित मात्र सर्वांनी मांडले. त्या उमेदवाराची सामाजिक पत काय आहे, त्याच्यामुळे त्याच्या भागामध्ये प्रश्न मिटणार आहेत की वाढणार आहेत याचा कोणीही विचार केला नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे वरिष्ठ म्हणून काम करणाऱ्या पुढाऱ्यांनी प्रत्येक उमेदवाराला तुला तिकीट मिळविण्यासाठी मी प्रयत्न करीन असे शब्द दिले. ज्यांना तिकीट मिळाले नाही असे दोघे तिघे एकत्र आल्यानंतर जेव्हा त्या नेत्याविषयी चर्चा झाली तेव्हा त्याने आपल्याला असे सांगितले हे प्रत्येकाने सांगितले आणि प्रत्येकाला आपण मामा बनवलं गेलो याची प्रचिती आली. एका पक्षाने आपल्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह नगरसेवकांना देण्यासाठी मोठा निधी पाठवला परंतु सदरचे निधी वाटप करताना भेदभाव झाला त्यामुळे या पक्षाचे सर्वच उमेदवार पडणार असल्याची शक्यता आता व्यक्त केली जात आहे. उमेदवार आता आपल्या हे उमेदवार आता आपल्या नेत्यांना आम्हाला कसा धोका दिला गेला हे भेटून सांगणार आहेत अशी चर्चा आहे. काहींना तीस लाख काहींना वीस लाख काहींना दहा लाख काहींना पाच लाख तर काहींना तीन लाख अशा पद्धतीने निधी वाटप झाल्याने त्या त्या भागातील उमेदवारांमध्ये नाराजीची तीव्र भावना दिसून आली. काहींनी वरिष्ठांनी माल गायब केला व स्वतःची बेगमी करून ठेवली अशी प्रतिक्रिया दिली. याबाबत नजीकच्या काळामध्ये जाहीरपणे नाराजी उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोणत्याच पक्षाचा जाहीरनामा नसल्याने जो कोणी निवडून येईल तो आता कोणते प्रश्न घेऊन वाटचाल करणार? याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.



## पिंपळगाव माळवी येथे कृषीकन्यांचे आगमन

**नगर तालुका । रयत समाचार**

विळदघाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्या औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नुकत्याच पिंपळगाव माळवी येथे दाखल झाल्या आहेत. कृषी क्षेत्रातील प्रात्यक्षिके, नवीन तंत्रज्ञान, सुधारित पद्धती आणि शेतीविषयक माहिती गावकऱ्यांना देण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत, कार्यक्रम समन्वयक प्रा. किरण दांगडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. पुनम ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषीकन्या अश्विनी मुळे, साक्षी मुठे, मानसी निमसे, प्रतिक्षा राऊत, साक्षी रोडे, किरण सावंतफुले शेतकऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. उपक्रमासाठी डॉ. एच. एल. शिरसाठ, डॉ. व्ही. एस. निकम, डॉ. डी. एम. नलावडे, प्रा. के. बी. मोरे, डॉ. मावळे यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे. यावेळी सरपंच राधिका संजय प्रभुणे, उपसरपंच मच्छिंद्र सोपान झिने, ग्रामपंचायत सदस्य मंजाबापू बेरड, संगीता झिने, सागर गुंड, सुधीर गायकवाड, तसेच सामाजिक कार्यकर्ते मेजर गुंड उपस्थित होते. कृषीकन्यांच्या या उपक्रमामुळे गावातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतींबाबत उपयुक्त माहिती मिळून कृषी उत्पादनक्षमतेत वाढ होण्यास मदत होईल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## भारतीय सैन्यात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुक्यातील शाहूराव पाटील कापरे महाविद्यालय, सामनगाव येथील दोन विद्यार्थी कानिफ डमाळे आणि गौरव म्हस्के यांच्या भारतीय सैन्यदलात झालेल्या निवडीबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान प्राचार्य रमेश भुसारी यांनी भूषवले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अण्णासाहेब म्हस्के यांनी करून विद्यार्थ्यांच्या यशाचा प्रवास, महाविद्यालयातील घडवणूक व मार्गदर्शनाबाबत माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते निवड झालेल्या दोन्ही विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य भुसारी म्हणाले, ''जीवनात ध्येय निश्चित केले तर कोणतीही अडचण अडथळा ठरत नाही. जिद्द, चिकाटी आणि देशसेवेची भावना असेल तर यश नक्कीच मिळते.'' सैन्यात दाखल होणे हे केवळ करिअर नसून देशसेवा असल्याचे सांगत तरुणांनी याप्रकारे धाडसाने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांच्या यशामध्ये पालक, शिक्षक व महाविद्यालयाचा मोलाचा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अण्णासाहेब म्हस्के यांनी केले. प्राध्यापक वाणी, संगिता खरड, रंजना लवांडे, चितळे, रिचोडे, गणेश पोटभरे, भगवान कापरे, शिवाजी गवळी, जाधव सर, तसेच मेजर गणेश म्हस्के, बाळासाहेब म्हस्के, दत्तात्रय खरड, शिवाजी कापरे, किशोर काकडे, भाऊसाहेब गवळी, भाऊसाहेब काकडे, रमेश कांबळे यांसह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून अशा गौरव सोहळ्यांमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून देशसेवेची प्रेरणा अधिक दृढ होते, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता

विश्वरत्न महामानव डॉ.. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महापरिनिर्वाण दिन. महापरिनिर्वाणदिनी महामानव डॉ.. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन! जागतिक कीर्तीचे विचारवंत अशी ओळख आलेल्या विश्वरत्न डॉ.. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारे विचारवंत म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जगभर ओळख आहे मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ज्या जाहिराती किंवा शुभेच्छा संदेश दिल्या जातात त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ओळख दलितांचे उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार अशीच करून दिली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलीत उद्धाराचे कार्य तर जगजाहीर आहे. जगाला हेवा वाटेल अशी राज्यघटना त्यांनी देशाला दिली. त्यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच विविध जाती, धर्म, पंथ, भाषा, संस्कृती असलेला आपला देश एकसंघपणे बांधला गेला आहे. भारतासारखी राज्यघटना नसल्याने भारताच्या शेजारी असलेल्या देशांची आज काय अवस्था झाली आहे हे आपण पाहतोच आहे. त्यामुळे त्यांची दलीत उद्धारक आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ही ओळख यथायोग्यच असली तरी त्यांचे कार्य केवळ एवढ्या पुरतेच मर्यादित नाही. थोर अर्थतज्ज्ञ, महिलांचे उद्धारक, कृषी तज्ज्ञ, शिक्षण तज्ज्ञ, जलतज्ज्ञ इतिहास तज्ज्ञ, समाज शास्त्रज्ञ, कायदेपंडित, धर्म चिकित्सक, राजनीती तज्ज्ञ, कामगार नेते, शांतीचे उपासक, कलाप्रेमी, लेखक, पत्रकार असे विविध पैलू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे विविध पैलू कायम दुर्लक्षित केले जातात म्हणूनच मी माझ्या महिलांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषक धोरण या मागील दोन लेखात डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी महिलांसाठी केलेले कार्य आणि जलतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन पैलूंची ओळख करून दिली होती आज मी डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची पत्रकार म्हणून असलेल्या पैलूंची ओळख करून देणार आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा पत्रकारितेचा प्रवास मूकनायक पासून सुरू झाला. नंतर हा प्रवास बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत पर्यंत सुरूच राहिला. सामाजिक आणि राजकीय ध्येयासाठी स्वत:चे वर्तमानपत्र असावे असे डॉ. बाबसाहेब आंबेडकरांना वाटले म्हणूनच त्यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. दलितांवर होणाऱ्या अन्याय,अत्याचाराला वाचा फोडण्याचं काम मूकनायक पाक्षिकानं निष्ठेनं केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तुटलेल्या पक्षाप्रमाणे होते. सुरुवातीला पांडुरंग नंदराम भटकर पाक्षिकाचे संपादक होते. त्यानंतर मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी असणारे ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे संपादक पदाची जबाबदारी आली. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. मूकनायक पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. मूकनायक एप्रिल १९२३ मधे बंद पडले. इ.स. १९२४ मध्ये डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र सुरू केले. ३ एप्रिल १९२४ रोजी बहिष्कृत भारत पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २९ जून १९२८ रोजी समता हे वृत्तपत्र सुरू केले. हे समाज समता संघाचे मुखपत्र होते. २४ फेब्रुवारी १९३० रोजी त्यांनी जनता तर ४ फेब्रुवारी १९५६ मध्ये प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्र सुरू केले. इ.स. १९४४ मध्ये बाबासाहेबांनी ''आम्ही शासनकर्ती जमात बनणार'' या शीर्षकाखाली जनता वृत्तपत्रात लेख लिहिला. या वृत्तपत्रांद्वारे आपल्या विचारांनी त्यांनी स्पृश्य आणि अस्पृश्यांना जागृत केले. त्यांची लेखनी झुंजार, क्रांतिकारी आणि प्रभावी होते. डॉ.. बाबासाहेब आंबेडकरांची सर्व वृत्तपत्रे मराठी भाषेमध्ये प्रकाशित झालेत कारण मराठीच त्यावेळेची सामान्य जनतेची भाषा होती. कारण बाबासाहेबांचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र होते आणि मराठी तिथली लोकभाषा आहे. बाबासाहेब इंग्रजी भाषेचे ही प्रकांड विद्वान होते, परंतु त्यांनी आपली वृत्तपत्रे मराठी भाषेत यामुळे प्रकाशित केली की त्यावेळी महाराष्ट्रातील बहुतांश दलित जनता जास्त शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीत समजू शकत होती. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, ''या मुकनायकाने बहिष्कृत भारतामधील लोकांना प्रबुद्ध भारताकडे नेले. बाबासाहेब महान पत्रकार होते.'' पत्रकार महामानव डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन!!

# नगर परिषदेच्या निवडणुका लांबल्याने शहरांत सामसूम; गजबजलेल्या हॉटेल्समध्ये शुकशुकाट

राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी या नगर परिषदा व नेवासा नगर पंचायतीच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याने या शहरांतील गजबजलेले ढाबे व हॉटेल्समध्ये सध्या शुकशुकाट पहावयास मिळत आहे. दररोज मिळणाऱ्या भोजनावळी एकाएकी बंद पडल्याने सध्या या शहरांत सामसूम आहे.

गेल्या ०२ डिसेंबरला उपरोक्त नगर परिषदा व नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी मतदान होणार होते. परंतु, ०२ डिसेंबरच्या पूर्वसंध्येला या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्याचे जाहीर होताच निवडणुकीचा ज्वर लगेच ओसरला. या निवडणुकांसाठी आता २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. तोपर्यंत आपल्या मतदारांचे



हट्ट कसे पुरवायचे, या विवंचनेत असलेल्या उमेदवारांची मोठीच अडचण निर्माण झाली आहे. अगोदरच तयारीसाठी कमी कालावधी मिळाल्याने उमेदवारांची धावपळ उडाली होती. तरीही कशीबशी रमारम करुन प्रत्येक उमेदवाराने यथाशक्ती प्रयत्न केले होते. परंतु, सदर निवडणुका ऐन रंगात आल्या असतानाच त्या पुढे ढकलल्याने उमेदवारांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. त्यामुळे, घराबाहेर न पडताच प्रत्येक उमेदवार सामाजिक माध्यमांवर सक्रिय आहेत. घराबाहेर पडावे तर चटावलेले मतदार जेवणाची किंवा पैशांची मागणी करत आहेत.

नोव्हेंबर महिन्याच्या उत्तरार्धात उत्तम बडदास्त ठेवली जात असल्याने खुशीत असलेला खुशालचेंडू मतदार डिसेंबर महिन्यातील थंडीत गारठून गेला आहे. एखादा उमेदवार नजरेस पडलाच तर लगेचच त्याच्याभोवती मतदारांचा गराडा पडत आहे. ''आम्ही तुम्हालाच मतदान करणार होतो, परंतु दुर्दैवाने मतदान पुढं ढकलल्याने आमचा नाईलाज झाला.'' अशी खुशामत करत, उमेदवार कधी एकदा खिशात हात घालतो याची वाट पहात आहेत. परंतु, गेल्या महिन्यातच महत्प्रयासाने खर्चाची तोंडमिळवणी करता करता बेजार झालेले उमेदवार, ''थोड्या वेळाने बघतो,'' म्हणून घर गाठत आहेत. बराच वेळ वाट पाहून फोन केला तर उमेदवारांचे फोन बंद असतात. या पार्श्वभूमीवर, आता पुढे काय करावे या विवंचनेत उमेदवार तर पुन्हा एकदा वाटप होईल की नाही, या विवंचनेत मतदार आहेत. भोंग्यांच्या गाड्या बंद झाल्याने शांतताप्रिय मतदार मात्र सुखावला आहे. एकंदरीत कडाक्याच्या थंडीत शिशिर ऋतूची चाहूल लागल्याने झाडांच्या पानगळीला सुरुवात झाली असून मतदारांच्या आशेची पालवीही सुकली आहे.

**यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह**

## बालआनंद मेळाव्यास तीन हजार विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । रयत समाचार**

सलग ४१ वर्षे अखंड परंपरेने साजरा होत असलेल्या स्व. यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहाला यंदाही नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठी पसंती मिळाली. समारोहातील बालआनंद मेळाव्यात तब्बल तीन हजार विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले, अशी माहिती बालसाहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांनी दिली.कै. भगवानराव लोमटे यांनी सुरुवात केलेल्या या सांस्कृतिक उपक्रमाला गेल्या चार दशकांपासून विविध क्षेत्रांतील नामवंत कलाकार, साहित्यिक, व्याख्याते यांनी गाजविले आहे. यंदाच्या मेळाव्याचे वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग आणि त्यांच्या कलागुणांना मिळालेला दणदणीत प्रतिसाद.समारोहाच्या आयोजनात दगडू मथुरा बाबुराव लोमटे यांचे परिश्रम आणि सातत्य उल्लेखनीय ठरले. अंबाजोगाईकरांची सांस्कृतिक जाण, कलाप्रेम आणि उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम दरवर्षी अधिक भव्य होत असून, यंदाही मुलांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद लक्षणीय ठरला. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच सर्जनशीलता, चारित्र्य विकास आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. अंबाजोगाईतील कलारसिक आणि विद्यार्थी सहभागींच्या उपस्थितीने हा ४१ वा स्मृती समारोह विशेष गाजला.

# 'पप्याच्या पिंकीची लव्ह स्टोरी' चित्रपटाचे पोस्टर अनावरण

## ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी केले कौतुक

**मुंबई । रयत समाचार**

मराठी चित्रपटसृष्टीतील एक नावीन्यपूर्ण प्रेमकथा प्रेक्षकांच्या भेटीला आणणारा 'पप्याच्या पिंकीची लव्ह स्टोरी' या आगामी मराठी चित्रपटाचे पोस्टर अनावरण मुंबईत करण्यात आले. अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक गजेंद्र अहिरे आणि निर्माते बलभीम पठारे यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.

यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक गजेंद्र अहिरे यांनी चित्रपटाच्या कथा-संकल्पनेविषयी आनंद व्यक्त केला, तर ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी नवोदित कलाकारांचे



कौतुक करत चित्रपटाला मनापासून शुभेच्छा दिल्या.

या चित्रपटातून मराठीत पदार्पण करणारे कश्मीरा रंजन आणि ऋषिकेश वाम्बूरकर हे नवोदित कलाकारही या सोहळ्यात उपस्थित होते. त्यांच्या भूमिकांबद्दल प्रेक्षकांमध्ये उत्सुकता पाहायला मिळत आहे. पायल पठारे आणि मेघमाला पठारे यांनी निर्मित केलेला हा चित्रपट पप्याच्या पिंकीची लव्ह स्टोरी' वर्ष २०२६मध्ये प्रदर्शित होणार आहे. मराठी प्रेक्षकांसाठी एक हृदयस्पर्शी, तरुणांना भावणारी प्रेमकथा मोठ्या पडद्यावर पाहण्याची उत्सुकता या पोस्टर अनावरणानंतर अधिकच वाढली.

## दोन दिवसांत मुंबईत शिक्षक संघटनेसोबत बैठक

# संचमान्यता निर्णयातील जाचक अटी रद्द करणार- दादा भुसे



**छत्रपती संभाजीनगर । रयात समाचार**

१५ मार्च २०२४ रोजी जारी केलेल्या संचमान्यता निर्णयातील शिक्षक अहिताच्या आणि जाचक अटी रद्द करण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली. छत्रपती संभाजीनगर येथे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षणमंत्र्यांची भेट घेऊन झालेल्या सविस्तर चर्चेनंतर ही माहिती समोर आली.

संचमान्यता निर्णयाविरोधात काही संघटनांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने शासनाच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करता येणार नसल्याचे नमूद करत तो निर्णय कायम ठेवला. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील हजारो शिक्षक अतिरिक्त होण्याची भीती निर्माण झाल्याने शिक्षक वर्गामध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे. हीच परिस्थिती लक्षात घेऊन शिष्टमंडळाने शिक्षणमंत्र्यांशी चर्चा करत जाचक अटी रद्द करण्याची आग्रही मागणी केली. शिक्षणमंत्र्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत पुढील दोन दिवसांत मुंबईत संघटनेसोबत बैठक घेऊन शिक्षकांना अडचणीत आणणाऱ्या सर्व अटी रद्द केल्या जातील, असे आश्वासन दिले.

अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य संयुक्त सचिव राजेंद्र निमसे यांनी दिलेल्या माहितीनुसार शिक्षणमंत्र्यांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे शिक्षकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या भेटीत राज्याध्यक्ष केशव जाधव, राज्य सरचिटणीस राजेश सुर्वे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष देविदास बस्वदे, जिल्ह्यातील शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, हनुमंतराव शिंदे तसेच एकल शिक्षक सेवा मंचाचे प्रतिनिधी विकास खांडेकर उपस्थित होते. या निर्णयाचे स्वागत अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे पदाधिकारी कल्याण लवांडे, राजेंद्र निमसे, बाळासाहेब कदम, शरद वांढेकर, सुनील शिंदे, प्रदीप चक्रनारायण, सुरेश नवले, रामप्रसाद आव्हाड, शिवाजी ढाकणे, सुधीर बोऱ्हाडे, विष्णू बांगर, संजय शेळके, संदीप भालेराव, रज्जाक सय्यद, सुधीर रणदिवे, मधुकर डहाळे, विलास लवांडेआणि इतरांनी केला. संचमान्यता निर्णयामुळे निर्माण झालेल्या संकटातून मार्ग काढण्यासाठी शिक्षणमंत्र्यांनी दाखविलेली सकारात्मक भूमिका शिक्षक वर्गासाठी महत्त्वाची ठरणार असून आगामी मुंबई बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महावीर कलादालनात 'साहित्यनगरी' ग्रंथप्रदर्शन सुरू

## १० ते ५० टक्के सवलतींसह वाचकांना ग्रंथमेजवानी

**अहमदनगर । रयत समाचार**

पुण्यातील 'साहित्यानगरीच्या वतीने मराठी व इंग्रजी पुस्तकांचे भव्य प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली असून, विविध प्रकारच्या साहित्यप्रकारांवरील हजारो पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी खुला झाला आहे. १० ते ५० टक्क्यांपर्यंत आकर्षक सवलती दिल्याने पुस्तकप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे, अशी माहिती संचालक नवनाथ व शिवाजी भाबड यांनी दिली.




अधिक माहिती देताना भाबड म्हणाले, या प्रदर्शनात कथा, कादंबरी, धार्मिक, ऐतिहासिक, बालवाङ्मय, पाककला, आरोग्य, संदर्भग्रंथ, शालेय व स्पर्धा परीक्षांची पुस्तके यांसह विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे. प्रसिद्ध लेखकांची लोकप्रिय पुस्तकेही खास किमतीत विक्रीस ठेवण्यात आली आहेत. स्थानिक लेखकांचीही पुस्तके येथे विक्रीस उपलब्ध आहेत.

'छावा, श्रीमान योगी, ययाती, अपरिपूर्ण, युगंधर, एक होता कार्वर, बुध्दभूषण, मृत्यूंजय, शिवचरित्र, ॲटोमिक हॅबिट्स, आमचा बाप अन् आम्ही, रिच डॅड पूअर डॅड, रावण, द अल्केमिस्ट, इंड्रस्टेड ट्रेडिंग' यांसारखी नामांकित पुस्तके वाचकांना विशेष सवलतीत उपलब्ध होत आहेत. प्रदर्शनस्थळी विविध प्रकाशनांची नवी, चर्चित तसेच क्लासिक पुस्तके मोठ्या प्रमाणावर मांडण्यात आली असून, वाचकांकडून देखील या उपक्रमाचे स्वागत होत आहे. हे प्रदर्शन महावीर कलादालन, माळीवाडा बस स्थानकाजवळ, अहिल्यानगर येथे भरविण्यात आले असून, अधिक माहितीसाठी साहित्यनगरीचे संचालक शिवाजी भाबड ९०९६७३२६५० आणि नवनाथ भाबड ९८२२७८५८०१ यांना संपर्क साधावा.

# ऋषिकेश पाटील महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सोशल मीडिया अध्यक्षपदी

**कोल्हापूर । रयत समाचार**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या सोशल मीडिया विभाग अध्यक्षपदी कोल्हापूरचे हृषिकेश सर्जेराव पाटील यांची नियुक्ती जाहीर होताच पक्षात नवचैतन्याची लाट उसळल्याचे चित्र दिसत आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार जारी करण्यात आलेल्या पत्राद्वारे ही नियुक्ती अधिकृत करण्यात आली.

सध्या काँग्रेसपुढे उभे असलेले आव्हानात्मक राजकीय वातावरण, सतत सुरू असलेली पक्षांतरे आणि आधीच्या पदाधिकाऱ्यांची अपेक्षित कामगिरी न झाल्याने निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हृषिकेश पाटील यांनी ही धुरा स्वीकारणे हा धाडसी निर्णय मानला जात आहे.

कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगतिशील विचारांनी सिंचित झालेल्या मातीतून आलेल्या पाटील यांची ही निवड पक्षाच्या नव्या दमदार रणनीतीचे द्योतक आहे, अशी चर्चा पुरोगामी कार्यकर्त्यांमध्ये रंगू लागली आहे.

सोशल मीडिया या आजच्या राजकीय रणांगणात महत्त्वपूर्ण ठरलेल्या क्षेत्रात पक्षाची उपस्थिती



मजबूत करण्याची जबाबदारी आता पाटील यांच्या खांद्यावर आली आहे. पक्षाशी एकनिष्ठ राहून काम करणाऱ्या आणि कठीण परिस्थितीतही ठाम भूमिका घेणाऱ्या नेतृत्वाची गरज असताना पाटील यांची निवड 'योग्य वेळी घेतलेला योग्य निर्णय' अशी प्रतिक्रिया अनेकांकडून व्यक्त होत आहे. कोल्हापूरच्या परंपरेनुसार शाहूपुरी तालीम, जोतिबाचे बळ आणि अंबाबाईचे आशीर्वाद घेऊन ऋषिकेश पाटील सोशल मीडिया रणांगणात पक्षाला बळ देण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांच्या निवडीचे राज्यभरातून अभिनंदन होत असून, ''राजर्षी शाहूंचा पाटील सक्षम आहे'' हे सिद्ध करण्यासाठी कार्यकर्त्यांकडूनही उत्स्फूर्त पाठिंबा व्यक्त केला जात आहे.